# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/09/2023 (शुक्रवार) दुपार

---

### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. नरखेड** :– अंतर्गत ०१ कि. मी अंतरावर रेल्वे कॉटर नरखेड येथे दिनांक २१/०९/२०२३ चे १५/०० वा. ते १६/४५ वा. दरम्यान यातील आरोपी नामे– कीर्ती राकेश बूवाडे, वय २५ वर्ष, रा. करवार हेटी पोस्ट दारीमेठा जि. छिंदवाडा मध्य प्रदेश ह. मू रेल्वे कॉटर नरखेड हिने आपली मूलगी नामे – कु. देवीका राकेश बूवाडे, वय ०३ वर्ष हिला ओढनी व दोरीने फॅनला लटकून गळयाला फाशी देवून जिवानीशी ठार मारले व स्वत: ओढनी व दोरीने फॅनला लटकून गळयाला फाशी घेवून आत्महत्या केली व स्वत:च्या मूलीचे मरणास कारणीभूत ठरली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राकेश मूननलाल बूवाडे वय ३६ वर्ष रा करवार हेटी पोस्ट दारीमेठा जि. छिंदवाडा मध्य प्रदेश ह. मू रेल्वे कॉटर नरखेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक सारीका गूरुकर पोस्टे नरखेड मो. नं. ९६६५८३४९९९ हे करीत आहे.

### घरफोडी

**पो.स्टे. बोरी** – अंतर्गत मौजा प्रसाद कॉलनी बोरी जि. नागपुर येथे दिनांक २१/०९/२०२३ चे ११.१५ वा. ते १३.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे – सौ. प्रणिता हर्शल लोढे, वय ३० वर्ष रा. प्रसाद कॉलनी बोरी हे त्यांच्या ब्युटी पार्लरमध्ये हजर असता दुपारी १३.४५ वा. दरम्यान त्यांचे शेजारी राहणारी सौ. कल्यानी तावडे यांनी फोन करून सांगितले कि, तुमच्या घराचे दार उघडे दिसत आहे. घरी कोणी आहे कि नाही. असे विचारले असता फिर्यादी या घरी पोहोचल्या तर घराचे दार उघडे होते. घरातील वस्तु अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या. कपाटाची पाहणी केली असता, कपाटात ठेवलेले ३०,०००/– रू. नगदी मिळुन आले नाही, दोन हातघडयाळ किंमती अंदाजे २,०००/– रू. व चांदीच्या पायपट्टया किंमती अंदाजे २,०००/– रू. असा एकुण ३४,०००/– रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना/९४३ गाते पोस्टे बोरी मो. ८७८८९८८६३६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर